## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ ची जबानी

मी प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | संजय विष्णु खेत्रे |
| वय | :– | ५९ वर्षे, |
| व्यवसाय | :– | सेवानिवृत्त |
| राहणार | :– | महादेवगल्ली, जामखेड ता. जामखेड, जि. अहमदनगर. |

**साक्षीदाराचा सरतपास सरकार पक्षातर्फे श्री. डी. एल. नळवाडे, सहायक सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फतः**

०१. दि.०६/०७/२०२१ रोजी जामखेड पोलीस स्टेशन येथे सुनिल बडे या पोलीसाने मला सरकारी पंच म्हणून बोलाविले होते. आरोपीने असे निवेदन दिले की, मी काठीने मारले आहे, तलवारीने मारले नाही. ज्या काठीने मी मारले ती काठी घराच्या शेजारी पाचरडाखाली लपवून ठेवली आहे. त्यानुसार पिंपळगांव मार्गे आपटी–वाकी रोडलगत आरोपीच्या घराशेजारी गेलो. आरोपीने पाचरडाखाली लपवून ठेवलेली काठी काढून दिली. ती माझ्यासमक्ष जप्त केली. त्याबाबतचा जप्ती पंचनामा माझ्यासमोर तयार केला. तो वाचून दाखवला. तो समजून मी त्यावर सही केली. आता माझ्यासमोर केलेला निवेदन पंचनामा दाखविण्यात आला, तो तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यास **नि. क्र. ७७** देण्यात येते. आता मला माझ्यासमक्ष केलेला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे, त्यास **नि. क्र. ७८** देण्यात येते. त्यावेळी माझ्यासमोर दुसरा पंच अविनाश दगडू साबळे हा होता. जी काठी माझ्यासमक्ष जप्त केली होती, ती दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दि. ६/७/२०२१ रोजी जप्ती केलेली ओबडधोबड

काठी दाखविण्यात आली, ती तीच असून ते **अर्टिकल ब** वर आहे. मी आरोपीस ओळखू शकत नाही. कारण घटनेस ४ ते ५ वर्षे होवून गेले आहेत.

**सरतपास पूर्ण,**

**उलटतपास आरोपीतर्फे सुविदय विधिज्ञ श्री. सी.ए.ढाळे यांच्यामार्फत:–**

**०२.** ६/७/२०२१ रोजी मला पोलीसांनी बोलाविले होते. त्यावेळी पोलीस स्टेशनला सुनिल बडे व आरोपी भागवत गोरे, अविनाश साबळे हे होते. त्यादिवशी दुपारी३:०० वाजता आम्ही पोलीस स्टेशनच्या वाहनाने गेलो. जामखेड ते राजुरी अंतर अंदाजे ६ ते ७ कि.मी. आहे. राजुरी ते पिंपळगांव हे अंदाजे अंतर १० ते १२ कि.मी. आहे. पिंपळगांव ते आपटी वाकी हे अंतर अंदाजे ५ ते ६ कि.मी. आहे. जामखेड पोलीस स्टेशनला मी १२:३० वा. पोहोचलो. निवेदन पंचनामा १२:३० वाजता सुरु केला. पोलीस स्टेशनला अर्धा तास पंचनाम्याची लिखापडी चालली. एक ते सव्वा एक वाजेपर्यंत तो पंचनामा चालला. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा मी वाचून पाहिला नव्हता. आम्हाला घटनास्थळी पोहोचायला सव्वा ते दिड तास लागला. मी आरोपीचा घर क्रमांक सागू शकत नाही. आरोपीच्या घराशेजारी कोणाची घरे नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, घर आरोपीचे असल्याबाबत पोलीसांनी चौकशी केली नाही. तिथे आरोपीने एक काठी काढून दिली, ती जप्त केली. मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येतात. पुर्वेसः आरोपीची जमीन पश्चिमेसः भावकीतील गोरे यांची शेती.उत्तरेसः

स्वतःचे घर दक्षिणेसः वाकी – आपटी रस्ता.

३. पंचनामा ३ वाजता सुरु केला व तो अंदाजे ४ वाजता संपला. पोलीसांनी माझ्यासमोर दोन्ही पंचनाम्यावर वेळ टाकली. हे म्हणणे खरे आहे की, त्या पंचनाम्यावर मी व दुस–या पंचाशिवाय इतर कोणाच्या सहया नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्यासमक्ष कोणतीही काठी काढून दिली नाही अथवा कोणतेही निवेदन दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पोलीस स्टेशनला बोलावून माझ्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, **अर्टिकल ब** वरील काठी कोठेही मिळू शकते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी मा. न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण,**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.08.13 17:44:35 +0530

**(यु.ए.भोसले)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रमांक ०१),
**जामखेड**.

दिनांक:–१३/०८/२०२६
ठिकाण:– जामखेड